विशेष

# ‘जिरेनियम’ लागवडीतून मिळवा नफ्याचा सुगंध!

प्रा. पुष्पा हसनाळे
डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
कृषी महाविद्यालय,
विळद घाट, जि. अहमदनगर





जगात अशा अनेक वनस्पती आहेत ज्यांची किंमत बाजारपेठेत खूपच आहे. जिरेनियम ही वनस्पती यापैकीच एक असून, सुगंधी उत्पादनांमध्ये या वनस्पतीच्या तेलाला सर्वाधिक मागणी आहे. आपण वापरत असलेल्या दैनंदिन सौंदर्यप्रसाधनांमध्ये जिरेनियम वनस्पतीचे तेल सर्वाधिक प्रमाणात वापरले जाते. भारतीय बाजारपेठेतील जिरेनियम तेलाची गरज भागवण्यासाठी परदेशातून हे तेल मोठ्या प्रमाणात आयात करावे लागते, म्हणूनच जिरेनियमची लागवड स्थानिक शेतकऱ्यांना फायदेशीर ठरू शकते.

काही वनस्पती सुगंधी गुणधर्माच्या असतात, ज्यांचा वापर एखाद्या पदार्थाला सुगंध आणि चव येण्यासाठी केला जातो. त्यापैकी काही वैद्यकीय उद्देशाने देखील वापरल्या जातात. सुगंधी संयुगे वनस्पतींच्या वेगवेगळ्या अवयवांमध्ये असतात. लेमन ग्रास, खस, मेंथा, जिरेनियम इत्यादी वनस्पती सुगंधित वनस्पतींच्या श्रेणीमध्ये येतात. सुगंधी तेलाचा उपयोग हा औषधे, कॉस्मेटिक्स, साबण आणि डिटर्जंट पावडरमध्ये केला जातो. गेल्या दोन दशकांपासून जागतिक बाजारात तेल, सुगंधी रसायने आणि औषधी पदार्थांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

**सुगंधी वनस्पतींच्या शेतीचे फायदे**

१. 'सुगंधित शेती'मधून अधिक उत्पन्न मिळते. पारंपरिक शेतीमधून येणाऱ्या उत्पन्नाची तुलना केली तर सुगंधित शेतीमधून येणारे उत्पन्न हे दुप्पट असते. सोयाबीन, गव्हासारख्या पिकांच्या पारंपरिक शेतीमधून शेतकरी जवळजवळ पन्नास ते साठ हजार रुपये प्रतिवर्ष प्रतिएकर कमवू शकतो. परंतु सुगंधित शेतीमधून प्रतिएकर सव्वा ते दीड लाख रुपयांपर्यंत उत्पन्न शेतकरी घेऊ शकतो.

२. अतिवृष्टी, दुष्काळ इत्यादी परिस्थितीचा या शेतीवर फारसा परिणाम होत नाही. पारंपरिक शेतीमध्ये दुष्काळामुळे, अतिवृष्टीमुळे किंवा कधीकधी पीक कापणी करून शेतात असते, ते पावसात ओले झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागते. बहुसंख्य शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन शेतीसाठी भांडवल उभे केलेले असते. जर अशा प्रकारचे नुकसान झाले तर शेतकरी आर्थिकदृष्ट्या अनेक वर्षे मागे जाऊ शकतो. परंतु सुगंधित शेतीमध्ये अतिवृष्टी, दुष्काळासारख्या समस्यांचा प्रभाव जास्त पडत नाही.

३. या शेतीमधून रोजगार निर्माण होऊ शकतो. जसे की



कापणीच्या ठिकाणीच शेतकऱ्याने जर ऊर्ध्वपातन युनिट उभे केले असेल तर तिथे त्याला मजूर लागतात.

४. सुगंधित शेतीसाठी जास्त प्रमाणात पाण्याची आवश्यकता नसते. पाण्याच्या फवाऱ्याने म्हणजे तुषार सिंचन किंवा ठिबक सिंचनासारख्या साधनांनीही ही शेती करता येऊ शकते. आपल्याकडे पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. दुष्काळग्रस्त भागांमध्ये भूमिगत जलस्तर कमी होण्याची समस्या उग्र स्वरुपात आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड करणे फायद्याचे ठरेल.



## जिरेनियमची शेती

जगात अशा अनेक वनस्पती आहेत ज्यांची किंमत बाजारपेठेत खूपच आहे. जिरेनियम ही वनस्पती यापैकीच एक असून सुगंधी उत्पादनांमध्ये या वनस्पतीच्या तेलाला सर्वाधिक मागणी आहे. आपण वापरत असलेल्या दैनंदिन सौंदर्यप्रसाधनांमध्ये जिरेनियम वनस्पतीचे तेल सर्वाधिक प्रमाणात वापरले जाते. भारतीय बाजारपेठेतील जिरेनियम तेलाची गरज भागवण्यासाठी परदेशातून हे तेल मोठ्या प्रमाणात आयात करावे लागते.

## जिरेनियम लागवडीचे तंत्र

जिरेनियम ही एक सुगंधी व औषधी वनस्पती आहे. लागवडीसाठी मध्यम प्रतीची जमीन अनुकूल असते. हे पीक माळरानावरही घेता येईल. म्हणजे जिथे ट्रॅक्टरने नांगरता येईल अशा कोणत्याही जमिनीत जिरेनियमचे पीक घेता येईल.

सर्वसाधारण २० ते ३४ अंश सेल्सियस तापमानात हे पीक चांगले येते. २० अंश से. पेक्षा कमी किंवा ३४ अंश से. पेक्षा

जास्त तापमानात पिकाची वाढ खुंटते व पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही. या पिकासाठी आर्द्रता ७५% ते ८० % लागते.

या पिकाची लागवड करताना शेतीची योग्य प्रकारे नांगरणी व मशागत करून घेणे खूप गरजेचे असते, कारण तीन वर्षे हे पीक शेतात राहणार आहे. मशागत केल्यानंतर बेड व्यवस्थित तयार करून घ्यावेत. ठिबक सिंचनाचा वापर करावा आणि चार बाय दीड फूट अंतरावर लागवड करावी.

या वनस्पतीची एकदा लागवड केल्यास किमान तीन वर्षे उत्पादन मिळते.

एका एकरमध्ये १०,००० हजार रोपे लागतात. लागवडीनंतर पहिल्यांदा हे पीक चार महिन्यांनंतर कापणीला येते व त्यानंतर प्रत्येक तीन महिन्याला कापणीला येते. अशा प्रकारे हे पीक एका वर्षात तीन वेळा कापणीला येते.

सुरुवातीला एकरी खर्च ७० ते ८० हजार येतो. इतर पिकांच्या तुलनेत फवारणी व खते यामध्ये ७५% खर्च कमी आहे.

एका एकरात तीस ते चाळीस किलो ऑईल वर्षाला मिळू शकते. एक लिटर ऑईलची किंमत जागेवर १२ ते १२,५०० रु. मिळू शकते. एक एकरामध्ये एका वर्षात चार ते पाच लाखांचे ऑईल मिळू शकते. (एकरी उत्पादन सरासरी चार ते पाच लाख.)

या वनस्पतीला भारतात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

तेलाची मागणी दर वर्षाला २०० ते ३०० टनांची आहे.





पण सद्यस्थितीत भारतात वर्षाला दहा टन देखील ऑईल निर्मिती होत नाही. त्यामुळे या सुगंधी औषधी वनस्पतीची लागवड करणे अधिक फायदेशीर ठरेल. अशा या औषधी वनस्पतीची भारतात लाखो एकर शेती केली तरी कमीच आहे.

### पारंपरिक पिकांपेक्षा दुप्पट उत्पन्न

आपल्या पारंपरिक पिकांपेक्षा हे पीक दुप्पट नफा देणारे आहे. या वनस्पतीवर फारसे कीडरोग येत नाहीत. त्यामुळे खर्च कमी आहे आणि उत्पन्न जास्त आहे. कोणतेही जनावर याचा पाला खात नाही. या पिकाला जास्त फवारणीची गरज नसते. निरोगी आणि १००% उत्पन्न देणारे पीक आहे. तसेच जिरेनियम वनस्पतीच्या तेलाला शाश्वत बाजापेठ उपलब्ध आहे. बाजारामध्ये या पिकाला हमीभाव देखील मिळतो.

### पिकाची देखभाल

जिरेनियम या पिकाच्या फांद्यांची तोडणी करून त्यापासून तेल बनवले जाते. ज्या भागात जास्त पाऊस पडतो तेथे फक्त पावसाळ्यात जास्त काळजी घ्यावी लागते. कारण जास्त पावसामुळे पिकाच्या खालच्या भागातील फांद्या खराब होऊ शकतात. त्यामुळे पावसाळ्यात या पिकाची काळजी घेणे गरजेचे असते. उर्वरित ऋतूंमध्ये या पिकावर काहीही परिणाम होत नाही.

### विविध उपयोग

जिरेनियम तेलापासून अनेक सुगंधी पदार्थ बनवले जातात. औषधी, कॉस्मेटिक्स साबण आणि डिटर्जंट शाम्पू, सेंट, अगरबत्ती पावडर वगैरे अशा प्रकारच्या अनेक वस्तूंमध्ये याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. या वस्तूंना बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. कापणीनंतर उरलेल्या पालापाचोळ्यापासून खतनिर्मितीही करता येते. ■